**कृपया प्रसिध्दीसाठी** **21 नोव्हेंबर 2012**

## जुन्या पिढीतील महिला नेता शालिनी कुलकर्णी यांचे निधन

**मुंबई,बुधवार:** भारतीय जनता पार्टी, मुंबईच्या जुन्या पिढीतील नेत्या व माजी नगरसेविका श्रीमती शालिनी कुलकर्णी यांचे नुकतेच निधन झाले. त्या 86 वर्षांच्या होत्या.

भारतीय जनसंघाच्या माध्यमातून राजकारण, समाजकारणात प्रवेश करुन आपल्या नेतृत्वाचा ठसा शालिनीताईंनी मुंबईत उमटविला. सत्तरच्या दशकात गाजलेल्या महागाई विरोधी महिला आंदोलनात भारतीय जनसंघाच्या अनेक महिला नेत्या प्रकाशझोतात आल्या. सर्वश्रीमती जयवंतीबेन महेता, मालती नरवणे, चंद्रकांता गोयल, निर्मला शेंडे, कांता ओतूरकर, पुष्पा वागळे यांच्यासह श्रीमती शालिनी कुलकर्णी यांनी या आंदोलनाचे यशस्वी नेतृत्व केले. आणीबाणीविरोधी आंदोलनातही त्या अग्रेसर होत्या. पुढे दादर विभागातून त्या नगरसेविका म्हणून निवडूनही आल्या. दादर, प्रभादेवी, सैतानचौकी, वरळी कोळीवाडा परिसरात आजही त्यांचे आदराने नाव घेतले जाते.

पती निधनानंतर काही वर्षांपूर्वी श्रीमती शालिनीताई कुलकर्णी पुण्याला आपल्या भाच्याकडे श्री. प्रकाश बोकील यांजकडे राहावयास गेल्या होत्या. तिथेच त्यांचे निधन झाले. भारतीय जनता पार्टीतील त्यांचे समकालीन सहकारी व माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी श्रीमती शालिनीताई यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. ‘‘सामान्य महिलांना समाज कारणासाठी प्रेरित करुन त्यांच्या दैनंदिन समस्यांना वाचा फोडण्याचे काम अत्यंत प्रभावीपणे शालिनीताई करीत. त्यांच्यामुळे सुरुवातीच्या काळात महिला वर्ग पक्षाशी जोडला जाण्यास मोठीच मदत झाली’’, असेही यावेळी श्री. राम नाईक म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**